| MHBI150016282022 | फौजदारी किरकोळ अर्ज क्रमांक २३२/२०२२<br>निशाणी क्र. १ वरील आदेश<br>जैनुद्दीन इब्राहिम शेख विरुध्द महाराष्ट्र सरकार तर्फे<br>पोलीस निरीक्षक, पाटोदा पोलीस ठाणे |
|---|---|

१. अर्जदार यांनी सदरचा अर्ज फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४५७ प्रमाणे पाटोदा पोलीस स्टेशनमधील गु.र.नंबर १०१/२०२१ मध्ये जप्त केलेली बजाज ॲटो कंपनीची पल्सर १५० एम.सी. मोटारसायकल क्रमांक एम.एच.–०५–ए.जी.–१९९५ ही परत मिळावी याकरीता दाखल केला आहे.

२. अर्जदार यांचे असे म्हणणे आहे की, सदरचे वाहन अर्जदार यांच्या मालकीचे असून अर्जदार यांच्या दैनंदिन वापरातील आहे. सदर गुन्हयामध्ये वाहनाच्या हद्दीपर्यंत तपास पूर्ण झालेला आहे. सदरचे वाहन पोलिस स्टेशनमध्ये पडून राहिल्यास नैसर्गिक आपत्तीपासून नुकसान होणार आहे. न्यायालयाने घालून दिलेल्या सर्व अटी व शर्तींचे पालन करण्यास तयार आहे. त्यामुळे सदरचे वाहन बॉन्डवर परत मिळावी अशी विनंती अर्जदार यांनी केली आहे.

३. तपासी अंमलदार यांनी निशाणी ६ येथे आपले म्हणणे सादर करुन असे कळविले आहे की, गुन्हयातील जप्त वाहन हे साक्ष पुराव्याचे वेळी आरोपीकडून हजर ठेवण्याची शाश्वती नसल्याने सदरचे वाहन अर्जदार यांचे ताब्यात देण्यात येऊ नये अशी विनंती केली आहे.

४. सहा. अभियोक्ता यांनी आपले म्हणणे निशाणी १ वर सादर करुन असे कळविले आहे की, जप्त वाहन हे गंभीर स्वरुपाच्या गुन्हयात जप्त करण्यात आलेले आहे. सदर वाहनाची पुराव्यादरम्यान गरज भासू शकते. तसेच अर्जदाराचे ताब्यात वाहन दिल्यास वाहनाची मालकी, ताबा तसेच वाहनामध्ये फेरबदल होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्ज नामंजुर करण्यात यावा ही विनंती केली आहे.

५. अर्जदारतर्फे विधीज्ञ व सहा.सरकारी अभियोक्ता यांचा युक्तीवाद ऐकला.

६. तपासी अंमलदार यांच्या म्हणण्यावरुन स्पष्ट होते की, सदरचे वाहन महाराष्ट्र

दारुबंदी अधिनियम कलम ६५(अ) प्रमाणे पाटोदा पोलीस ठाणे यांचे गु.र.नं.१०१/२०२१ मध्ये जप्त करण्यात आलेले आहे. सदर वाहनाचा चेसीस नं. MDRDHDH22MCK31911, इंजिन नं. DHGBMK69502, मॉडल – पल्सर १५० एम.सी. व रंग – इबोनी ब्लॅक असा आहे. अर्जदार यांनी निशाणी ४ सोबत अनुक्रमांक १ वर गु.र.नंबर १०१/२०२१ मधील एफआयआरची प्रत, अनुक्रमांक २ वर अर्जदाराचे आधारकार्डची सत्यप्रत, निशाणी १० सोबत अनुक्रमांक १ वर वाहनाचे आरसीबुकची सत्यप्रत इत्यादी कागदपत्रे दाखल केलेली आहेत. या कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदरचे वाहन हे अर्जदार यांच्याच मालकीचे आहे.

७. मा. सर्वोच्च न्यायालय यांनी ***सुंधरभाई अंबालाल देसाई वि. स्टेट ऑफ गुजरात (सुप्रा) रिपोर्टेड इन 2003 All MR (Cri.) 363 (SC)*** या न्यायनिवाडयात मुद्देमाल परतीबाबत आदेश करताना प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांना मार्गदर्शन सुचना घालून दिलेल्या आहेत. या मार्गदर्शन सुचनाप्रमाणे कोणताही मुद्देमाल १५ दिवस ते १ महिन्यापेक्षा जास्त कालावधीकरीता पोलिस स्टेशनमध्ये पडून राहता कामा नये त्याबाबत प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांनी योग्य ते आदेश केले पाहिजेत असे निर्देश दिले आहेत.

८. सदरचे वाहन पोलिस स्टेशनमध्ये जास्त दिवस पडून राहीलेस ऊन, वारा व पाऊस यामुळे या वाहनाचे नुकसान होवू शकते. अर्जदार यांच्या व्यतिरिक्त अन्य कोणीही सदर वाहनावर हक्क सांगितलेला नाही. त्यामुळे अशा परिस्थितीत काही अटीवर अर्जदार यांना हे वाहन परत देणे न्यायोचीत होणार आहे म्हणून खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## // आ दे श //

**१.** अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

**२.** पाटोदा पोलीस स्टेशन यांचेकडील गु.र.नं.१०१/२०२१ मध्ये जप्त केलेली बजाज अॅटो कंपनीची पल्सर १५० एम.सी. मोटारसायकल क्रमांक एम.एच.–०५–ए.जी.–१९९५ ही अर्जदार यांनी रक्कम रुपये ९०,०००/– (अक्षरी रुपये नव्वद हजार मात्र) चा सुपूर्दनामा पोलीस स्टेशन, पाटोदा यांना सादर करुन देणेच्या अटीवर व खालील अटीवर परत देण्यात यावी.

**अ)** अर्जदार यांनी सदर वाहनाचा रंग अथवा बाह्य स्वरुपात या गुन्हयांचा

निकाल होईपावेतो कोणताही बदल करणेचा नाही.

**ब)** अर्जदार यांनी आवश्यकता असेल तेंव्हा सदरचे वाहन न्यायालयात अथवा संबंधीत पोलिस स्टेशनमध्ये हजर करावे.

**क)** अर्जदार यांनी सदर गुन्ह्याचा निकालापावेतो हे वाहन कोणत्याही प्रकारे कोणासही तबदील करणेचे नाही.

**ड)** अर्जदार यांनी या वाहनाचे दोन रंगीत फोटो विविध कोनातून जवळून घेतलेले दाखल करावेत.

**इ)** अर्जदार यांनी सदरच्या वाहनाचा वापर या गुन्ह्याचा निकालापावेतो इतर कोणत्याही गुन्ह्यात करणेचा नाही.

३) तपासी अंमलदार यांनी सदर वाहन अर्जदार यांच्या ताब्यात देताना त्याचा रितसर पंचनामा करुन सदरचे वाहन सत्वर अर्जदार यांचे ताबेत द्यावे व तसा अहवाल या न्यायालयास सादर करावा याबाबतचे सुचनापत्र तपासी अंमलदार यांना पाठविण्यात यावे.

४) या आदेशाची छायांकित प्रत पाटोदा पोलीस स्टेशन यांचे गु.र.नं.१०१/२०२१ मध्ये ठेवणेत यावी.

**(न्यायासनावर निवेदीत व आधीघोषीत करण्यात आले)**

Digitally signed by Snehal Nivasrao Nikam
Date: 2022.11.19 17:04:39 +0530

ठिकाण – पाटोदा (श्रीमती एस.एन.निकम)

दिनांक – १९/११/२०२२ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पाटोदा

**:: C E R T I F I C A T E ::**

"I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Judgment/order".

Sd/-
(R.M.Naik)
Steno Grade-III

| | | |
|---|---|---|
| (a) | Dictated on | : 19/11/2022 |
| (b) | Transcribed on | : 19/11/2022 |
| (c) | Checked & signed on | : 19/11/2022 |